परिशिष्ट : २

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उप-नियम :

प्रत्येक बाजार समितीला शेतमालाच्या विपणनासाठी व्यवस्थीत आणि खुलासेवार उप-नियम तयार करावे लागतात. या उप-नियमांना दि. डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चरल मार्केटिंग महाराष्ट्र स्टेट , पुणे यांची मान्यता घ्यावी लागते. या उप-नियमात बाजार समितीची उद्दिष्टये आणि तिच्या कार्याचे क्षेत्र स्पष्ट करावे लागते. या बरोबर नियमनाची प्रक्रिया ( व्यवसाय) आणि खरेदी विक्री संबंधीच्या अटी व उप-नियम तयार करण्याचा अधिकार १९३९ च्या मुंबई कायदयातील विभाग २७ नुसार बाजार समितीला देण्यात आला आहे. दि. महाराष्ट्र ॲग्रिकल्चरल प्रोडयूस मार्केटिंग ( रेग्युलेशन ) ॲक्ट १९६३ मधील विभाग ६१ मध्ये या अधिकारात विस्तार करण्यात आला आहे. त्यानुसार परवाना देणे, परवाना फी ठरविणे, शेतमालाची विक्रीकरणे, वजने व मापे, शेतमाल साठविण्याच्या सुविधा इत्यादीवर नियंत्रण करण्याचे उप-नियम ठरविण्याचा अधिकार बाजार समितीला दिला आहे. करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे कांही महत्वाचे उप-नियम या प्रमाणे -

अ) मुख्य आणि दुय्यम बाजार आवार :

दि महाराष्ट्र ॲग्रिकल्चरल प्रोडयूस मार्केटिंग ( रेग्युलेशन ) ॲक्ट मधील विभाग ११ आणि ६४ (२) नुसार प्रत्येक बाजार समितीला मुख्य आणि उप बाजार आवार स्थापन करण्याची परवानगी दिली आहे. या आवाराची स्थापना सरकारी अधिकृत पत्रीकातून आणि उप-नियमातुन जाहिर झाल्याशिवाय मान्य केली जात नाही. करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीने करमाळा या ठिकाणी मुख्य बाजार आवार स्थापन केला असून जेऊर केम आणि जिंती या ठिकाणी उप बाजार आवार स्थापन केले आहेत. या बाजार आवारांच्या बाजार क्षेत्राची मर्यादा करमाळा तालुक्याच्या महसुल

विभागाएवढी निश्चित केली आहे. ही आकृती १ मे. १९४९ च्या अधिकृत पत्रीकातून जाहिर झाली आहे.

ब) <u>बाजारात कार्य करणा-या व्यक्ती</u> : (Market Functionaries)

बाजारात कार्य करणा-या वेगवेगळ्या व्यक्तीचे उप-नियमानुसार केलेले स्पष्टीकरण :

| | | |
|---|---|---|
| १) बाजार कार्यकर्ता | : | या व्यक्तीने विशिष्ट बाजाराच्या आवारामध्ये होणा-या व्यवहारात भाग घेण्यासाठी प्रत्येक वर्षी परवाना घेतलेला असतो. |
| २) अ वर्ग व्यापारी | : | ही व्यक्ती शेती उत्पादित मालाचा व्यवहार बाजार क्षेत्राच्या कोणत्याही ठिकाणी करू शकते. ( बाजार आवार (मार्केट यार्ड) सोडून ) |
| ३) ब वर्ग व्यापारी | : | ही व्यक्ती बाजार आवारा सहित बाजार क्षेत्रामध्ये शेती उत्पादनाची खरेदी -विक्री करू शकते. |
| ४) क) वर्ग व्यापारी | : | या व्यक्तीस बाजार आवारात किरकोळ (घाऊक) व्यवसाय करण्यास परवानगी दिलेली असते. |
| ५) आडत्या | : | या व्यक्तीला बाजार क्षेत्रात कोणत्याही वस्तुचा कमिशन एजंट म्हणून व्यवहार करण्यास परवानगी दिलेली असते. |
| ६) व्यापारी नं. १ | : | या व्यक्तीच्या वार्षीक व्यवहाराची उलाढाल ५०, हजार रूपये ते १ लाख रूपयांच्या दरम्यान असते. या व्यक्तीला बाजार क्षेत्रात असणा-या सर्व शेतमालाचे व्यवहार करण्यास परवानगी दिलेली असते. |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

७) व्यापारी नं.२ : या व्यक्तीच्या वार्षीक व्यवहाराची उलाढाल २० ते ५० हजार रूपयांच्या दरम्यान असते या व्यक्तीला बाजार क्षेत्रात येणा-या सर्व वस्तुंचा व्यापार करता येतो.

८) व्यापारी नं.३ : या व्यक्तीचा व्यवसाय २० हजार रूपयापर्यंत असतो.

९) प्रक्रिया करणार नं. १ : या व्यक्तीची व्यवसाय मर्यादा प्रत्येक वर्षी ५० हजार ते १ लाख रूपयांच्या दरम्यान असते. ही व्यक्ती प्रक्रिया करणे आवश्यक असलेल्या सर्व वस्तुंचे व्यवहार करू शकते.

१०) प्रक्रिया करणार नं. २ : या व्यक्तीची व्यवसाय मर्यादा प्रत्येक वर्षी २० ते ५० हजार रूपयांच्या दरम्यान असते. ही व्यक्ती बाजार क्षेत्रात प्रक्रिया करणे आवश्यक असलेल्या सर्व वस्तूंची खरेदी करू शकते.

११) व्यापा-याचा मदतनिस: ही व्यक्ती व्यापा-याकडुन बाजार क्षेत्रात केल्या जाणा-या व्यवहाराला मदत करण्यासाठी नेमलेली असते.

१२) भंडारी/गोडावून रक्षक : या व्यक्तीला बाजार आवारात उभारलेल्या गोडावून मध्ये माल साठविण्यासाठी परवानगी असते.

१३) तपासनीस : खरेदीदार व विक्रेता यांच्यात वाद निर्माण झालेल्या शेतमालाचा दर्जा, परिणाम किंमत आणि इतर गोष्टी तपासने हे या व्यक्तीचे काम असते.

१४) तोलार (W:ighman) आणि अ वर्ग हमाल : वर्षासाठी परवाना घेतल्यानंतर या व्यक्तीला बाजार आवारात (मार्केट यार्ड) काम करण्यास परवानगी असते. या व्यक्तीला बाजार समिती-कडून बिल्ला (Badge ) घ्यावा लागतो.

१५) तोलार आणि ब वर्ग हमाल : या व्यक्तीस परवान्याच्या आधारे बाजार क्षेत्रात कार्य करण्यास परवानगी दिलेली असते. या व्यक्तीला बाजार समितीकडुन बिल्ला घ्यावा लागतो.

१६) गाडीवान (Cartman) : या व्यक्तीला गाडी बैलाच्या सहाय्याने शेतमालाची एका ठिकाणापासुन दुस-या ठिकाणी ने-आण करण्यासाठी परवाना दिलेला असतो.

१७) गाडीवानाचा मदतनिस (Assistant to Cartman) : या व्यक्तीला गाडीवानास शेतमाल एका ठिकाणाहुन दुस-या ठिकाणी ने-आण करण्यासाठी मदत करण्यास परवाना दिलेला असतो.

क) बाजारात कार्य करण्यासाठी परवाना :
(Licence for the Market Functionaries)

१९६३ च्या महाराष्ट्र कायदयातील विभाग ( Section) ६ नुसार कोणत्याही व्यक्तीला परवाना असल्या शिवाय बाजार समितीच्या आवारात होणा-या शेतमालाच्या विपणन प्रक्रियेत भाग घेता येत नाही. १९६३ च्या महाराष्ट्र कायदयातील विभाग ७ नुसार बाजार समितीला परवाना मंजुर करण्याचे आणि त्याचे नुतनीकरण करण्याचे अधिकार दिले आहेत.

अनुज्ञप्तिच्या संदर्भात करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीने उप-नियम क्रमांक ४(१) केला आहे. त्यानुसार मुख्य किंवा दुय्यम बाजार किंवा बाजार क्षेत्रात अन्य ठिकाणी शेती उत्पन्नाची खरेदी - विक्री व इतर अन्य संबंधीत व्यवहार करु इच्छिणा-या व्यक्तींना महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियमन) १९६७ च्या कायद्यातील नियम क्रमांक ६ व ७ यास पात्र राहून खाली नमुद केलेल्या दराने बाजाराच्या प्रत्येक वर्षाकरीता परवाना घ्यावा लागतो.

ड) अनुज्ञप्ति (परवाना) शुल्काचे दर :

अनुज्ञप्ति शुल्कच्या दरासंबंधी करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीने उप-नियम क्रमांक ४ (२) मध्ये तरतुद केली आहे. या तरतुदी नुसार वेगवेगळ्या

अनुज्ञप्तिसाठी या बाजार समिती कडुन आकारल्या जाणा-या अनुज्ञप्ति शुल्काचे स्पष्टीकरण प्रकरण ४ मधील कोष्टक १६ मध्ये केलेले आहे.

फ) <u>अनुज्ञप्तिधारीने ठेवावयाची कागदपत्रे त्यांची किंमत व तपासणी</u>:

उप-नियम क्रमांक ९ नुसार प्रत्येक अनुज्ञप्ति धारीने पुढील कागदपत्रे जवळ ठेवावी लागतात. त्यांची तपासणी करण्याचा अधीकार बाजार समितीला देण्यात आला आहे.

१) बाजार किंवा बाजार क्षेत्रात काम करणारे आडते, व्यापारी, दलाल, प्रक्रिया करणार , तोलणार, मापणार, व इतर अनुज्ञप्तिधारी यांना बाजार समिती वेळोवेळी ठरवील त्या पध्दतीने व नमुन्या प्रमाणे कागदपत्रे, नोंद वहया, जमा खर्चाच्या वहया, खरेदी-विक्री साठा वहया, हिशोब पट्टी, बील पुस्तके लिलाव नोंद पुस्तके, फी प्रपत्रे, माहिती पत्रके वगैरे ठेवली पाहिजेत.

२) बाजार समितीकडून अनुज्ञप्तिधारींना पुरविण्यात येणारी सर्व प्रकारचे प्रपत्रे नोंद वहया, पुस्तके, माहिती पत्रके वगैरच्या किंमती बाजार समिती ठरविल त्याप्रमाणे असतील .

३)फ (१) नियमानुसार ठेवण्यात आलेल्या अभिलेखातील बाजार समितीकडून विचारण्यात आलेली नित्य किंवा नैमत्तिक माहिती बाजार समितीस अनुज्ञप्तिधारीने पुरविली पाहिजे.

४) सभापती किंवा सचिव किंवा बाजार समितीने या बाबतीत अधिकार दिलेल्या अन्य सेवकाने मागणी केली असता अनुज्ञप्तिधारीने कागदपत्रे तपासणीसाठी सादर केली पाहिजेत. तसेच त्यांच्या व्यवसायाच्या सर्व ठिकाणी प्रवेश करुन तपासणी करुन दिली पाहिजे.

५) फ (४) च्या कारणाकरीता सभापती सचिव किंवा बाजार समितीने या बाबतीत अधिकार दिलेल्या सेवकास.

५:१)अनुज्ञप्तिधारीच्या कोणत्याही व्यवसायाचे ठिकाणी प्रवेश करण्याचा

५:२) कोणतीही कागदपत्र ,वहया, नोंदवहया, तपासण्याचा व त्यातील कोणत्याही मजकुराची नक्कल करून घेण्याचा अगर मागण्याचा

५:३) बाजार किंवा बाजार क्षेत्रातून बाहेर जाणा-या अथवा बाजार किंवा बाजारक्षेत्रात प्रवेश करणा-या कोणत्याही वाहनास थांबविण्याचा त्यातील वस्तु पाण्याचा अधिकार असेल.

६) अशा तपासणीचे काम हे तपासणी चालु असलेल्या बाबी संबंधी माहिती मिळविण्यापुरतेच मर्यादित असले पाहिजे आणि अशा रितीने मिळविलेली माहिती बाजार समितीच्या कायदेशीर कारणाकरीताच उपयोगात आणली पाहिजे.

ग) <u>अनुज्ञप्तिधारीची वर्तणूक</u>:

अनुज्ञप्तिधारीची बाजार आवारात व क्षेत्रात वर्तणूक कशी असावी या संबंधी तरतूद उप-नियम क्रमांक १० मध्ये केली आहे ती पुढील प्रमाणे-

१) कोणत्याही अनुज्ञप्तिधारीने कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीशी बाजार क्षेत्रात जाहीर केलेल्या शेतमाल संबंधात व्यवहार करता कामा नये.

२) "१" च्या कारणाकरीता अधिकृत इसम म्हणजे बाजार समितीचे अनुज्ञप्तिधारी व माल विक्रेते हे समजण्यात यावेत.

३) कोणत्याही आडत्याने किंवा कोणत्याही खरेदीदाराने कोणत्याही अनुज्ञप्तिधारी तोलणारा, मापणारा, सर्वेक्षक यांना आपल्या नोकरीत घेता किंवा चालु ठेवता कामा नये किंवा ठरवून दिलेल्या बाजार दरापेक्षा जादा रक्कम पैशाचे किंवा अन्य स्पाने देता कामा नये.

४) तोलणारांनी व मापणारांनी आवश्यक असेल त्या प्रमाणे आवश्यक असेल तेंव्हा बाजार समिती तोल व मोजमाप करण्यासंबंधी जी पध्दत व रीत आमलात आणील किंवा ठरविल त्यापध्दतीने व रीतीने वागण्याचे नाकारता कामा नये.

घ) शेतमालाच्या उत्पन्नावरील शुल्कचे दर:

उप-नियम क्रमांक १२ नुसार बाजार क्षेत्रात खरेदी केलेल्या शेतीच्या उत्पन्नावर बाजार समितीला शुल्क आकारण्याचा व वसुल करण्याचा अधिकार आहे. आकरली जाणारी आणि वसुल केली जाणारी शुल्क प्रकरण ४ मधील चौथ्या भागातील ब(१) मध्ये स्पष्ट केली आहे.

च) मालाची पोहच देणे:

उप-नियम क्रमांक १८ नुसार आडत्या किंवा खरेदीदार याचे दुकानी माल विक्रीसाठी आणल्याबरोबर आवक नोंद वहीत नोंद करून माल आणणा-या इसमास त्या मालाची पोहोच पावती ताबडतोब दिली पाहिजे.

छ) बाजार भावाची परिमाणे:

उप-नियम क्रमांक २१ मध्ये बाजार भावाची पुढील परिमाणे ठरविण्यात आली आहेत.

| शेतमालाचा प्रकार | दर ठरविण्याचे व वजन माप सांगण्याचे परिमाण |
|---|---|
| अ) ज्वारी, बाजरी, गहू, मका, शेंगा, शेंगदाणे, करडी, तिळ, जवस, मुग, मटकी, हरभरा, उडीद, हुलगा, गुळ, मिरची, कापुस, जोड, साळ, नागली, तांदूळ, सरकी, अंबाडी, चिंच, ऐरंडी, कांदा, निंबोळी, चिंचोका, सूर्यफुल बी. | एका क्विंटल मध्ये |
| ब) अंबा | १०० नगामध्यें |
| क) बैल, गाय, म्हैस, रेडे शेळया, मेंढया | एका नगावर |
| ड) कडबा | १०० पेंढयामध्ये (किंवा शेकडयामध्ये) |

ज) <u>वजना मापाची साधने</u>:

उप-नियम क्रमांक २२(१) नुसार प्रत्येक आडत्या, व्यापारी, वखारवाला व प्रक्रिया करणारा यांना बाजार किंवा बाजार क्षेत्रात वापरण्याकरिता वजन मापाची खालील साधने ठेवली पाहिजेत.

१) एका वेळी किमान एक क्विंटल वजन करता येईल असे वजनाचे साधन किंवा साहित्य.

२) एक ग्रॅम पासून १०० किलोपर्यंतचे वजन करण्याची सर्व साधने.

३) द्रव पदार्थांकरिता वापरावयाची साधने व साहित्य.

झ) <u>बाजार आकार</u>:

उप-नियम क्रमांक २३ नुसार, आडते, व्यापारी, दलाल, तोलणारे, मापणारे, सर्वेक्षक, प्रक्रिया करणारे, हमाल, गाडीभाडे आणि वटवणी अभिकर्ता यांच्या कामगीरी बद्दल व शेती उत्पन्नाच्या खरेदी-विक्रीच्या संबंधात केलेल्या इतर कामाबद्दल आकारावयाचे बाजार आकार खालील प्रमाणे आहेत.

| बाजार आकाराचा प्रकार | आकारला जाणारा बाजार आकार |
|---|---|
| १) <u>आडत</u> | |
| अ) सर्व नियंत्रित शेतमालासाठी (कांदा व आंबा सोडून) | १०० रुपये किंमतीचे शेतमाल विक्रीस २ रुपये ४० पैसे शेतमाल विक्रेत्याकडून |
| ब) कांदा व आंबा या नियंत्रित शेतमालासाठी | १०० रुपये किंमतीचे शेतमाल विक्रीस ५ रुपये विक्रेत्याकडून |
| २) तोलाई शुल्क | एका क्विंटलला ४० पैसे शेतमाल विक्रेत्याकडून. |
| ३) हमाली | एका क्विंटलला ७५ पैसे शेतमाल विक्रेत्याकडून |

ट) सभा बोलविणे:

उप-नियम क्रमांक २५ नुसार खालील प्रसंगी बाजार समितीची सभा बोलाविली जाते.

१) बाजार समितीची दोन महिन्यातून एकदा सभा बोलविणे या सभा मधील अंतर ६० दिवसापेक्षा जास्त असता कामा नये.

२) उप समित्यांच्या सभा प्रसंगानुसार सभापतीच्या सल्ल्याने सचिवाला बोलविण्याचा अधिकार आहे.

३) संचालक स्वत: किंवा त्याने अधिकार दिलेल्या कोणत्याही व्यक्तीस निकडीच्या कामासाठी बाजार समितीची सभा बोलविण्याचा अधिकार आहे.

४) बाजार समितीच्या निम्म्याहून अधिक सदस्यांनी लेखी मागणी केल्यास मागणीचा अर्ज मिळाल्यापासून दहा दिवसाच्या आत सभापतीने बाजार समितीची सभा बोलविली पाहिजे. सदर मुदतीत सभा न बोलविल्यास सभेची लेखी मागणी करणा-या सदस्यांनी संचालकाकडे कळविल्यास संचालकाने अशी मागणी केल्याचा अर्ज मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत बाजार समितीची सभा बोलविली पाहिजे. अशा सभेला संचालकास अगर त्याने अधिकार दिलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्याचा अधिकार असेल.

ठ) सभांतील गणपूर्ती:

उप-नियम क्रमांक २८ नुसार बाजार समितीच्या सभेत मतदानाचा हक्क असणा-या एकूण सदस्यापैकी पाच सदस्यांची गणपूर्ती होईल. जर आवश्यक संख्ये इतके सदस्य हजर नसतील तर हजर असलेल्या सदस्यांनी किमान अर्धातास वाट पाहून तो पावतोही गणपूर्ती न झाल्यास सदरहू सभा तहकुब केली पाहिजे. अशी तहकुब झालेली सभा मुळ सभेच्या तिस-या दिवशी, मुळ सभेच्या नोटीशीत नमुद केलेल्या स्थळी वेळी घेतली पाहिजे. मग गणपूर्ती असो वा नसो.

त) सभेतील कामकाजाची भाषा:

सभांचे कामकाज मराठी भाषेत चालविण्यात व नोंदविण्यात आले पाहिजे अशी उप-नियम क्रमांक ३३ मध्ये तरतुद करण्यात आली आहे.

थ) <u>उप समित्यांची नियुक्ती</u>:

उप-नियम क्रमांक ३५ नुसार आवश्यक वाटतील अशा उप-समित्या नेमण्याचा अधिकार बाजार समितीला आहे. करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीने खालील उप-समित्यांची नियुक्ती केली असून त्यांची सभासद संख्या निश्चित केली आहे.

| | उप समितीचे नांव | | सभासद संख्या |
|---|---|---|---|
| १) | वांधा उपसमिती | ... | ६ |
| २) | सेवक उपसमिती | ... | ५ |
| ३) | अनुज्ञप्ति उपसमिती | ... | ५ |
| ४) | बांधकाम उपसमिती | ... | ५ |
| ५) | नियमन उपसमिती | ... | ५ |
| ६) | प्रतवारी उपसमिती | ... | ५ |
| ७) | उप बाजार आवार उपसमिती | ... | ५ |

या उप समित्यांच्या सभासदामध्ये बाजार समितीमधील १६ सभासदामधील सभासद निवडले जातात. शासनाच्या प्रतिनिधीची निवड केली जात नाही.

द) <u>बाजार निधीतून करावयाचे खर्च</u>:

उप-नियम क्रमांक ३६ नुसार १९६३ च्या कायधातील तरतुदी अन्वये १९६७ च्या कायधातील तरतुदी अन्वये व उपविधी अन्वये बाजार समितीस करता येणा-या खर्चा खेरीज संचालकाचे अनुमतीने खालील बाबीवर ही बाजार समितीस बाजार निधीतून खर्च करता येईल.

१) महाराष्ट्र राज्य मार्केट कमिटयांची सल्लागार समिती, पुणे या संस्थेची प्रवेशी फी, वार्षिक वर्गणी, परिषद वर्गणी किंवा इतर रक्कम देण्यासाठी.

२) किरकोळ खर्चासाठी.

३) अभ्यास दौ-यासाठी.

४) बाजार क्षेत्रातील खरेदी-विक्रीच्या विकासाला प्रोत्साहन देणा-या बाबीसाठी. उदा-प्रदर्शन भरविणे, भिंत्ती पत्रिका, मासिके, पुस्तिका प्रसिध्द करणे

व तत्सम खरेदी-विक्रीच्या विकासाला पोषक होईल असे कार्य हाती घेणे यासाठीचा खर्च.

ध) <u>सदस्यांना द्यावयाच्या भत्त्यासंबंधी</u>:

उप-नियम क्रमांक ३७(अ)(ब)(क) नुसार २०-७-८३ च्या सभेतील ठरावानुसार बाजार समितीच्या सभांना हजर राहण्यासाठी किंवा कामकाजासंबंधी प्रवास करावा लागल्यास सदस्यास भत्ते देण्याचा बाजार समितीस अधिकार आहे. या भत्त्याच्या दरासंबंधीचे स्पष्टीकरण चौथ्या प्रकरणातील भाग ४ मधील क(२) मध्ये दिलेले आहे.

न) <u>उपविधीचा भंग</u>:

उप-नियम ४४ नुसार बाजार समितीच्या कोणत्याही उप-नियमाचे उल्लंघन करणारा इसम गुन्हयाच्या शाबिदीनंतर महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियमन) १९६३च्या कायद्यातील कलम ६१(२) अन्वये रुपये १०० पर्यंत दंडास पात्र राहिल.

प) <u>उपविधी खाली उप-नियम करणेचा बाजार समितीचा अधिकार</u>:

उप-नियम क्रमांक ४६ नुसार संचालकाचे पूर्व मंजुरीस पात्र राहून खालील बाबतीत उप-नियम करण्याचा बाजार समितीस अधिकार आहे.

१) आवक झालेल्या शेतमालाचा नमुना तपासणे व अशा नमुन्यांचा साठा जपून ठेवणे.

२) ॲगमार्क व प्रतवारी करणेचे खर्चाचे दर व ॲगमार्क व प्रतवारी केलेल्या शेतमालाच्या विक्रीस प्राधान्य देणे.

३) शेतमालाचे प्रकार व प्रमाणभूत नमुने ठरविणे, भेसळ प्रतिबंधक उपाय योजना करणे.

४) नियमातील तरतुदीनुसार शेतमालाच्या विक्रीची पध्दत वजनामापाचे परिमाण.

५) शेतमालाच्या विक्रीचा हिशोब देण्याची पध्दत.

६) शेतीमालासंबंधी निर्माण झालेल्या विक्री, वजन अगर मोजमाप, बखाडा, हिशोब व इतर तत्संबंधीत बाबींचा वाद मिटविणे.

७) आडत्या, व्यापारी, दलाल, तोलणार व इतर अनुज्ञप्तिधारी यांचेकडून निरनिराळ्या प्रकारची टिपण व नैमित्तिक माहिती पत्रके बाजार समितीला सादर करणे.

८) वजन माप मोजण्याच्या पध्दती व पुस्तके प्रतींची संख्या व त्याचे निरनिराळ्या घटकांना वाटप.

९) आडत्या, व्यापारी, हमाल, दलाल, तोलणार, मापणार, सर्वेक्षक, वखारवाला, व मालधनी व बाजाराचे इतर संबंधीत घटक यांची पात्रता व त्यांची कर्तव्य.

१०) बाजार आणि बाजार क्षेत्रातील व्यवहाराचे ठिकाण वापरण्याबाबत नियम अटी किंमत भाडे वगैरे.

११) बाजारात येण्याजाण्याबद्दल तसेच वाहने उभी करण्यासंबंधी नियम.

"तेलबियांच्या विशेष संदर्भात शेतमालाचे विपणन:
करमाळा तालुक्याचा अभ्यास "
(एम्. फिल. प्रबंधासाठी प्रश्नावली)

१) अ) नांव :-
ब) गांव :-
क) वय :-
ड) व्यवसाय :- शेती / मजुरी / इतर.
फ) शिक्षण :- निरक्षर / प्राथमिक / माध्यमिक / उच्च शिक्षण

२) जमिनीचे धारण क्षेत्र :-

| क्षेत्र प्रकार | एकर |
| --- | --- |
| अ) बागायत | |
| ब) कोरडवाहू | |
| क) इतर | |
| ड) एकूण | |

३) तेलबियापैकी कोणत्या तेलबियांची पिके घेता ? का ?
शेंगा / करडी / सूर्यफुल / इतर

---

४) तुमच्या मते करमाळा बाजार आवार स्थापण्यामागे हेतू काय आहे.
अ) शेतमालाची विक्री करतांना शेतक-यांची केली जाणारी फसवणूक थांबविणे.
ब) व्यापारी वर्गाला सहाय्य करण्यासाठी.
क) काहीही नाही.

५) तुमच्या गावापासून बाजार आवारापर्यंत वाहतुकीच्या सुविधा कोणत्या प्रकारच्या आहेत.
अ) बैलगाडी, ब) ट्रक, क) ट्रॅक्टर, ड) इतर.

६) शेतमालाची किंमत उघड सौदापध्दतीने ठरविली जाते काय ?(होय/नाही)
नसल्यास कशी ठरविली जाते.

---

७) उघड सौदा पध्दतीने ठरविलीजाणारी किंमत तुम्हाला योग्य वाटते काय ?
(होय/नाही)
अ) योग्य वाटत नसल्यास कारण काय ?

---

ब) योग्य किंमत वाटली नाही तर तुम्ही शेतमालाची विक्री करता काय ?
(होय / नाही)
क) विक्री करत असल्यास कारण काय ?
१) व्यापा-याचे कर्ज घेतलेले असते.
२) तुम्हाला पैशाची गरज असते. म्हणून.
३) इतर कारणासाठी

८) विक्री पूर्वी तेलबियांची प्रतवारी केली जाते काय ? (होय/नाही)
अ) वेगवेगळ्या शेतक-यांच्या तेलबियांना समान प्रत मिळाल्यास त्या तेलबियांना समान किंमत मिळते काय ? (होय/नाही)
ब) समान किंमत मिळत नसल्यास कारण काय ?

---

९) शेतमालाला योग्य किंमत मिळत नसल्यास तुम्ही शेतमालाची साठवण करता काय ? (होय/नाही)
अ) नसल्यास कारण काय ?
१) पैशाची गरज असते.
२) साठवणुकींच्या सुविधांचा अभाव.
३) इतर कारणासाठी.
ब) शेतमालाची साठवण करीत असल्यास कोठे करता.
१) स्वत:च्या घरात.
२) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या गोदामात.
३) व्यापा-यांच्या गोदामात.
४) अन्य ठिकाणी.

१०) शेतमालाच्या किंमती कोणत्या परिमाणात ठरतात (क्विंटल/इतर)

११) योग्य वजना मापांचा वापर केला जातो काय ? (होय/नाही)

१२) शेतमालाचे वजन करताना तोलार प्रत्यक्ष हजर असतो काय ?(होय/नाही)

१३) शेतमालाच्या विक्रीचे व्यवहार त्याच दिवशी पूर्ण केले जातात काय ?
(होय/नाही)
अ) नसल्यास ते केंव्हा पूर्ण केले जातात.

---

१४) शेतमालाच्या विक्रीवर आडत, तोलाई ,हमाली आणि प्रतवारी फी या शिवाय कोणती शुल्क घेतली जाते काय ? (होय/नाही)

अ) घेतली जात असल्यास कोणती - - -- - - - - - - - - - - - -

१५) व्यापारी किंवा दलाल तुमच्या गांवात येवून शेतमालाची खरेदी करतात काय? (होय/नाही)

१६) बाजार आवारात तुम्ही कर्ज कोणाकडून घेता ?

१) बँका.
२) खाजगी सावकार.
३) दलाल
४) आडत्या.
५) इतराकडून.
६) कर्ज घेत नाही.

१७) बाजार भावा संबंधी बाजार समितीच्या कार्यालयातून तुम्ही माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे काय ? (होय/नाही)
अ) नसल्यास कारण काय ?
१) तुम्ही माहिती घेण्यासाठी बाजार कार्यालयात जात नाही.
२) कार्यालयात तुम्हाला माहिती सांगत नाहीत म्हणून.

१८) बाजार समितीच्या कार्याविषयी तुमच्या काही तक्रारी आहेत काय ? (होय/नाही)

अ) असल्यास कोणत्या
१)
२)
३)

१९) करमाळा बाजार आवारामुळे तुम्हाला कोणते फायदे मिळाले.
१) २)
३) ४)

२०) बाजार आवारात तुम्हाला कोणत्या अडचणी जाणवतात.
१) २)
३) ४)

संशोधक
श्री. ब्रह्मदेव भागवत डुकरे
अर्थशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४

संशोधक मार्गदर्शक
डॉ. सौ. व्ही. एम्. कशाळीकर,
अर्थशास्त्र विभाग,
देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर
व्हाया-निपाणी.

## संदर्भ सूची


१) Agrawal A.N. : Indian Agricultural, Vikas Publishing House Pvt. Ltd., New-Delhi (1980).

२) बापट श्री.ग. : वितरण शास्त्राची ओळख, उज्वला ग्रंथ भांडार, अप्पा बळवंत चौक, पुणे-२ (१९७७).

३) बोरीकर अशोक श्री. आणि कुळकर्णी पी.आर. : भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सहकार पिंपळापुरे अँण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर (१९८४).

४) Dantwala and Other : Indian Society of Agricultural Economics : Indian Agricultural Development since Independence, Oxford and IBH Publishing Co.PVT. LTD., New Delhi, Bombay, Calcutta (1986).

५) Datt Ruddar and Sundharam K.P.M.: Indian Economy S.Chand and Company (PVT) Ltd., Ram-Nagar, New Delhi -110 055(1987).

६) कडू रू. ज्ञा. : आधुनिक विपणन, पडगिलवार प्रकाशन, टिळक रोड, महाल नागपूर-२ ( १९७६ ).

७) Mamoria C.B. : Agricultural Problems of India, Kitab Mahal, Allahabad, Delhi (1979).

८) Mamoria C.B.: Agricultural Co-operative Structure in India, Kitab Mahal, Allahabad, Delhi, Patna, Nagapur (1983).

९) Mathur B.S.: Co-operation in India, Sahitya Bhawan, Agra-3 (1977 and 1988).

१०) पंडित शांता व पाटील लिला: कृषी अर्थशास्त्राची मूलतत्वे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, विधी महाविद्यालय परिसर, म.गांधी मार्ग, नागपूर-४४० ००१ (१९८६)

११) Prasad A. Sivaram: Agricultural Marketing In India, Mittal Publication, Delhi (1985).

१२) Sontakki C.N. and Deshpande R.G.: Marketing Salesmanship and advertising, Ravichandra Publication, Belgaum( १९७६ )

## अहवाल

१) भारत सरकार कृषि मन्त्रालय: ग्रामिण विकास विभाग, वार्षिक रिपोर्ट:१९८७-८८.

२) Government of India: Ministry of Agricultural, Department of Rural Development, Directorate of Marketing and Inspection Agricultural Marketing July.Sept., 1987.

३) कृषी उत्पन्न बाजार समिती, करमाळा: यांचे वार्षिक अहवाल १९७४-७५ ते १९८७-८८.

## प्रबंध

१) Ambapkar G.B.: Functioning of Regulated Market - A Case Study of Shahu Market Yard, Kolhapur, (M.Phil. Dissertation) (1986).

२) Kulkarni B.D.: Functioning of Regulated Markets in Solapur District with Special To Groundnut, Tur and Bajara (Ph.D. Thesis) (1977).

## नियतकालिके

१) मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक: अर्थसंवाद, खंड५, अंक १, एप्रिल-जुन-१९८१.

## नियमावली

१) कृषी उत्पन्न बाजार समिती, करमाळा: यांची उप-नियमावली.

...